डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

# कृषि विज्ञान केंद्र

अजिंठा रोड, सागवन, बुलढाणा - ४४३ ००२ (महाराष्ट्र)

डॉ.अनिल साहेबरावतारू
वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख

फोन / फॅक्स- ९९६०२३२४८०, ९४०५०४५२६४
Email -kvkbuldhana@gmail.com

जा.क्र./कृ.वि.कें.बुलढाणा/५७८ /२०२२

दिनांक:२२/०९/२०२२

## दरपत्रक सुचना पत्र

प्रती,

..........................................

..........................................

विषय : सन २०२२-२३ मध्ये कृषी विज्ञान केंद्र ,बुलढाणा अंतर्गत प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम, पशु रखवाली, फळबाग संबंधित कामे व इतर कामे कंत्राट पद्धतीने करण्याकरीता वैध परवानाधारक कंत्राटदाराकडून मनुष्यबळ पुरविण्यासाठी दर पाठविणेबाबत....

महोदय,

वरील विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की,डॉ.पं.दे.कृ.,विद्यापीठ अकोला अंतर्गत,कृषि विज्ञान केंद्र बुलढाणा येथील प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम, फळबाग, पशु रखवालदारी संबंधित कामे कंत्राटी पद्धतीने करण्याकरिता वैध परवानाधारक कंत्राटदाराकडून मजुरांचे (स्त्री-पुरुष) निविदा दर खालील प्रमाणे अटी व शर्तीस अधीन राहून मागविण्यात येत असून निविदा मसुदा/निविदेचे स्वरूप सोबत जोडण्यात आलेले आहे.

वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख,
कृषि विज्ञान केंद्र बुलढाणा

Scanned with OKEN Scanner

## दरपत्रक मसुदा

डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत कृषि विज्ञान केंद्र, बुलढाणा येथील प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम, फळबाग संबंधित कामे व इतर कामे कंत्राट पद्धतीने करण्याकरिता खालील प्रमाणे दर देण्यात यावेत.

| अ.क्र. | कामाचा तपशील | | तपशील | दर(रु) |
|---|---|---|---|---|
| | **अकुशल कामगारांचे कामे** | | | |
| १ | गाय,म्हैस,बैल इत्यादी जनावरांची देखरेख (प्रक्षेत्रावर चारणे, चारा तयार करणे, चारा पाणी रात्री व दिवसा करणे व जनावरांची काळजी घेणे, गोठे साफसफाई.) | | प्रति दिन | |
| २ | गाय/म्हैस सकाळ व सायंकाळ दुध काढणे | | प्रति दिन | |
| ३ | शेळी व मेंढी देखरेख ( प्रक्षेत्रावर चारणे,चारा पाणी करणे, निवारा साफसफाई, करडांना दुध पाजणे व काळजी घेणे) | | प्रति दिन | |
| ४ | कुक्कुटपालन देखरेख,दानापाणी करणे, अंडी गोळा करणे, राखण करणे, कुक्कुटपालन गृह साफसफाई, भांडे स्वच्छ करणे इ.) | | प्रति दिन | |
| ५ | पिकातील विरळणी करणे. | | प्रति दिन | |
| ६ | बियाणे टोकण करणे. | | प्रति दिन | |
| ७ | पिकांना फळबागांना पाणी देणे. | दांड पद्धत | प्रति दिन | |
| | | स्प्रिंकलर | | |
| ८ | पिकांची कापणी,मळणी व गंजी लावणे. | | प्रति दिन | |
| ९ | शेतातील धसकटे व काडीकचरा वेचणे. | | प्रति दिन | |
| १० | पिकांचे,फळझाडांचे इ. संरक्षण करणे/ पहारेकरी. | | प्रति दिन | |
| ११ | पिकातील डवरणी व वखरणी करणे. | | प्रति दिन | |
| १२ | पाठीवरच्या पंपाने फवारणी करणे. | | प्रति दिन | |
| १३ | फळबाग निगडीत दैनंदिन कामे. | | प्रति दिन | |
| १४ | शेतीशी निगडीत दैनंदिन कामे. | | प्रति दिन | |
| १५ | भांडार विभागातील कामे. | | प्रति दिन | |
| १६ | उत्पादित मालाचे वजन करणे. | | प्रति दिन | |
| १७ | उत्पादित माल दळणवळण करण्याकरिता मालाचे लोडिंग व अनलोडिंग. | | प्रति क्विं | |
| १८ | बीज प्रक्रिया केंद्राची सर्व कामे (प्रक्रिया,टॅगींग,बॅगिंगसह) | | प्रति क्विं | |
| १९ | रात्रपाळी रखवालदार (सांय ४ ते रात्री १२ व रात्री १२ ते स.८) | | प्रति दिन | |
| २० | थ्रेशर द्वारे मळणी करणे, पोते भरणे, वजन करणे, शिलाई मारणे व गोडाऊनला आणून थप्पी मारणे | | प्रति क्विं | |
| २१ | बियाण्याची साफसफाई, प्रतवारी करून बॅग भरणे, शिलाई मारणे, वजन करणे व कमी दर्जाचे बियाण्याची थप्पी मारणे | | प्रति क्विं | |
| २२ | पिकातील निंदण करणे,पुंजे उचलणे,गवत कापणे. | | प्रति दिन | |
| २३ | रोपवाटिकेतील सर्व कामे. | | प्रति दिन | |
| २४ | कार्यालय साफ सफाई,माती परीक्षण प्रयोगशाळेत व प्रशिक्षण मदतनीस. | | प्रति दिन | |
| २५ | पाईपलाईनशी निगडीत सर्व कामे करणे. | | प्रति दिन | |

Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| २६ | बैलजोडी द्वारे वखरणी/डवरणी करणे. | प्रति दिन | |
| २७ | ऐन वेळेवर आलेली शेतीशी निगडीत सर्व कामे करणे. | प्रति दिन | |
| | **कुशल कामगारांचे कामे** | | |
| १ | संगणकाशी संबधित कामे. | प्रति दिन | |
| २ | माती परीक्षण प्रयोगशाळेत मदतनीस. | प्रति दिन | |
| ३ | शेतकरी प्रशिक्षण,कृषि मेळावे, कृषि प्रदर्शनी ई.मदतनीस. | प्रति दिन | |
| ४ | बीज प्रक्रिया मदतनीस. | प्रति दिन | |
| ५ | कार्यालयीन मदतनीस | प्रति दिन | |

अटी व शर्ती:

१) निविदा पत्रक/कोटेशन कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.००ते दुपारी ५.३० यावेळेस स्विकारले जातील.

२) निविदा / कोटेशन वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख, कृषि विज्ञान केंद्र बुलढाणा यांच्या नावाने सीलबंद लिफाफा मध्ये पाठवावी.

३) कंत्राटदाराकडे संबंधित कामाचा वैध परवाना असणे बंधनकारक आहे. कंत्राटदाराला परवाना व संबंधित इतर सर्व आवश्यक कागदपत्रे निविदेसोबत या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

४) कंत्राटदारास मिळालेल्या कामाच्या देयकाचे १० टक्के रक्कम सुरक्षा ठेव (Security Deposit) म्हणून संबंधित विभागाकडे जमा करावी लागेल व काम पूर्ण झाल्यावर सुरक्षा ठेव परत मिळण्याकरिता संबंधित विभागाचे प्रभारी अधिकारी यांचेकडे अर्ज सादर करावा लागेल त्यानंतर सुरक्षा ठेव परत करण्यात येईल.

५) कंत्राट पद्धतीने प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम व फळबाग संबंधित कामे करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या स्त्री/पुरुष मजुरांचे व्यवस्थापनाची संपूर्ण जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील.

६) कृषि विज्ञान केंद्र, बुलढाणा कार्यालय अंतर्गत संपूर्ण प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम व फळबाग संबंधित कामे करीत असताना पिकांचे/फळबागांचे नुकसान झाल्यास विद्यापीठ प्रशासनाने ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे नुकसान भरपाई संबंधित कंत्राटदाराकडून वसूल करण्यात येईल.

७) प्रक्षेत्रावरील विभागावर बिजोत्पादन कार्यक्रम व फळबाग संबंधित कामे करते वेळी कुठलीही दुर्घटना / अपघात / जीवितहानी झाल्यास हे कार्यालय किंवा कोणताही कर्मचारी/अधिकारी किंवा विद्यापीठ जबाबदार राहणार नाही. याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील.

८) विभागावर देण्यात आलेले बिजोत्पादन कार्यक्रम व फळबाग संबंधित कामे पूर्ण करण्यात यावे, कामाबाबत विभागावरून तक्रार आल्यास किंवा काम अर्धवट राहिल्यास सदर कामाचे देयक काढण्यात येणार नाही.

९) विद्यापीठ प्रशासनाने वेळोवेळी निर्देशित केलेल्या नियमांचे पालन करणे संबंधित कंत्राटदारांना बंधनकारक राहील.

१०) कंत्राटदारांनी देयक सादर करतेवेळी बँक खाते बाबतची संपूर्ण माहिती सादर करावी, अन्यथा देयक अदा केले जाणार नाही.

११) या कार्यालयातर्फे कंत्राटदारास बिजोत्पादन कार्यक्रम व फळबाग संबंधित काम करण्याकरिता कोणत्याही प्रकारचे साहित्य पुरविण्यात येणार नाही,बिजोत्पादन कार्यक्रम व फळबाग संबंधित काम करण्याकरिता आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील.

१२) कंत्राटदारास बिजोत्पादन कार्यक्रम व फळबाग संबंधित कामाचे देयक काम पूर्ण व विहित वेळेत पूर्ण केल्यावर तसेच संबंधित विभागाचे प्रभारी अधिकारी यांनी काम समाधानकारक झाल्याचे प्रमाणित केल्यानंतरच कामाचे देयक पारित करण्यात येईल.

Scanned with OKEN Scanner

१३) प्रक्षेत्रावरील विभागावर बिजोत्पादन कार्यक्रम व फळबाग संबंधित कामे करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या स्त्री/पुरुष मजुरांना, कामगार (Labour Act) कायद्यानुसार किमान वेतन, विमासंरक्षण, भविष्य निर्वाह निधी देणे, कॅशलेस पद्धतीचा अवलंब करणे तसेच सर्व प्रकारचे करांचा नियमाने व नियमित भरणा करणे इत्यादीची संपूर्ण जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील.

१४) प्रक्षेत्रावरील विभागांवर बिजोत्पादन कार्यक्रम व फळबाग संबंधित कामे करीत असताना कोणताही वाद विवाद निर्माण झाल्यास सदर वाद-विवाद वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख, कृषि विज्ञान केंद्र, बुलढाणा यांचे समक्ष मिटविला जाईल व अंतिम निर्णय वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख, कृषि विज्ञान केंद्र, बुलढाणा यांचा राहील आणि तो सर्वांना मान्य करणे बंधनकारक राहील.

१५) प्रक्षेत्रावरील विभागांवर बिजोत्पादन कार्यक्रम व फळबाग संबंधित कामे ही एक वर्षांमधील खरीप, रब्बी व उन्हाळी या तिन्ही हंगामाकरिता असून कामाचे दर ३१ मार्च २०२३ पर्यंत वैध राहतील.

१६) सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचे व संपूर्ण जबाबदारी कंत्राटदारांची असल्याचे रु.१०० चे स्टॅम्प पेपरवर करारनामा सादर करणे संबंधित कंत्राटदारास बंधनकारक राहील.

१७) दरपत्रकामधील संबंधित कामे कंत्राट पद्धतीने करण्याचे दर नियमाप्रमाने सर्व करांसहित नमूद करण्यात यावे तसेच त्या कराचा विहित मुदतीमध्ये भरणा करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित निविदा धारकाची राहील. करा संबंधित कोणतीही तक्रार आल्यास विद्यापीठ प्रशासन जबाबदार राहणार नाही.

१८) निविदाचा काही भाग किंवा संपूर्ण निविदा स्वीकारण्याचा व नाकारण्याचा अधिकार कार्यालय प्रमुखास राहील.

१९) कृषि विज्ञान केंद्र बुलढाणा अंतर्गत प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम,पीक संशोधन प्रयोग संबंधित कामे तसेच वाहन विभाग तांत्रिक कामे करण्यासाठी पुरविण्यात आलेले कंत्राटी कर्मचारी हे १८ वर्षाच्या वर असावे तसेच ६० वर्षपेक्षा कमी असावे व त्यास कोणत्याही प्रकारचे अपंगत्व नसून ते शारीरिक दृष्ट्या सक्षम असावेत.

२०) कृषि विज्ञान केंद्र, बुलढाणा अंतर्गत प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम, पीक संशोधन प्रयोग संबंधित कामे तसेच वाहन विभाग तांत्रिक कामे करण्यासाठी पुरविण्यात आलेले कंत्राटी कर्मचाऱ्यांकडे संबंधित तांत्रिक कामाची पदविका/ आयटीआय प्रमाणपत्र/वाहन चालविण्याचा परवाना व कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

२१ पुरवठा धाराकाचे मजुर पुर्णतः कंत्राटी पद्धतीने असतील त्यात विद्यापीठ प्रशासनाचा कोणताही संबंध कामावर ठेवण्याबाबत राहणार नाही. मजुरांची कुठल्याही प्रकारची कामावर असल्याची जेष्ठता यादी विभागामार्फत देण्यात येणार नाही.

२२) कामाच्या आवश्यकतेनुसार मजूर उपलब्ध करून द्यावे लागतील.

२३) मजुरांची कामाची वेळ ही आठ तास ठरवून दिल्या प्रमाणे राहील.

२४) सदर संस्था/कंपनी/ठेकेदार असमाधानकारक काम करत असेल तर सदर संस्थेचे कंत्राट कोणत्याही क्षणी रद्द करण्याचे अधिकार निम्न स्वाक्षरीकर्त्याकडे राखीव असतील.

२५) सदर बाबतचे देयक सादर करण्याची जबाबदारी कंत्राटदार संस्थेची राहील.

२६) वरीलप्रमाणे अटी व शर्तीच्या अधीन राहून सोबत जोडलेल्या निविदा मसुदा तपशीला नुसार दि.२३/०९/२०२२ रोजी सांय ५.०० वा. पर्यंत कार्यालयीन वेळेत निवीदा सीलबंद लिफाफा मध्ये सादर करावी.

वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख
कृषि विज्ञान केंद्र बुलढाणा

Scanned with OKEN Scanner